# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम - ३३९/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. जमीर महमंदखाजा हन्नुरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-२ कुर्ला विभाग**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाचा घटक,
गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाचा घटक,
गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.१०.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. ०००४७८/२०१९ मध्ये दि. ०३.०४.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- २, कुर्ला विभाग यांनी अपिलार्थींना मुद्दा क्रमांक- १, ३ व ५ संबंधीची माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी.
२) जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि.१६.०३.२०१९ आजच अपिलार्थींना पुरवावे.
३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाच्या उक्त आदेशाप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन तक्रारकर्त्याने दिनांक २०.०३.२०१९ रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्यांकडून दिनांक १८.०९.२०१९ रोजी अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५.१०.२०१९ रोजी त्यांचा अहवाल आयोगास सादर केला आहे. तो अभिलेखावर घेण्यात आला.

सदर तक्रारीवर आज दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. सुनावणीचे वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमूद केले आहे की, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपनिबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे पाठपुरावा करुन देखील त्यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास मौखिकरित्या सांगितले की, सदर माहिती त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेली नाही. परंतू त्यांचे कार्यालयातून झोपुप्रा कार्यालयास केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत ते दाखवू शकले नाहीत. तसेच आयोगाचे आदेशाच्या वेळी माहिती त्यांचेच कार्यालयाकडे उपलब्ध होती.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आयोगाचे कार्यालयाकडून तपशील उपलब्ध करून दिलेला असतानाही जन माहिती अधिकारी यांनी पाच वर्षापासून आदेश होऊनही तक्रारकर्त्यांना माहिती दिलेली नाही. म्हणून आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

१. **तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु. २५,०००/- शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून रु. २५,०००/- शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

२. **या प्रकरणी दिनांक २३.१०.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता पुन्हा सुनावणी घेण्यात येईल**

**मुंबई**
**दिनांक : ०४.१०.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

निर्गमित
11 OCT 2024

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३३९/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. जमीर महमंदखाजा हन्नुरे**
**सुनावणी दिनांक : २३.१०.२०२४ (In continuation of order dt ०४.१०.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी आयोगाने दिनांक ०४.१०.२०२४ रोजी खालीलप्रमाणे आदेशीत केले होते:

"तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु. २५,०००/- शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून रु. २५,०००/- शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी. या प्रकरणी दिनांक २३.१०.२०२४ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल."

उक्त आदेशाच्या अनुषंगाने आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २३.१०.२०२४ चे निवेदन सादर करुन नमूद केले की, तक्रारकर्ता यांनी मुळ माहिती अर्जात ५ मुदयांची माहिती विचारली होती. मुद्दा क्रमांक १, ३ व ५ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेशी संबंधित होते. जे की, व्दितीय अपील अर्जात पक्षकार नव्हते. तरीही त्यांनी त्या कार्यालयाशी पत्र पाठवून माहिती देण्याची विनंती केली होती. तथापि, माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता आली नाही. आता त्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त केली आहे व दि. १८.१०.२०२४ च्या पत्रान्वये तक्रारकर्ते यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२९-१०-२०२४

**मुंबई**
**दिनांक : २९.१०.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**